**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**विद्यार्थी विकास मंडळ**

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/१०० दिनांक : १७/०७/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित नाशिक जिल्ह्यांतील
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या जिल्हानिहाय वार्षिक नियोजन सभेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **नाशिक जिल्ह्यांतील** सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधून नियुक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची वार्षिक नियोजन सभा मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०२६ रोजी के.आर.टी. आर्टस्, बी.एच. कॉमर्स ॲण्ड ए.एम.सायन्स कॉलेज (के.टी.एच.एम) नाशिक **(म.वि.प्र.चे कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह)** पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय आयोजित करण्यात आली आहे.

| दिनांक | जिल्हा | नाव नोंदणी व भोजन वेळ | सभा वेळ | महाविद्यालये | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०२६ | नाशिक | दुपारी ०१.०० ते दुपारी ०२.०० | दुपारी ०२.०० ते सायं. ०४.०० | नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | के.आर.टी. आर्टस्, बी.एच. कॉमर्स ॲण्ड ए.एम.सायन्स कॉलेज (के.टी.एच.एम) नाशिक **(म.वि.प्र.चे कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह)** |

**सदर सभेपुढील विषय** :

१. विद्यार्थी अपघात विमा योजना मार्गदर्शन.
२. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील विविध योजना व उपक्रमांचे मार्गदर्शन व वार्षिक नियोजन करणे.
३. विविध योजना व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज, अहवाल भरण्याबाबत आणि योजनेबाबत येत असणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करणे.
४. विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजनाबाबत.
५. आयत्या वेळचे विषय.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस वरीलप्रमाणे विहित दिनांकास व वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनीही आपला प्रतिनिधी परस्पर पाठवू नये याबाबतही आपण लक्ष घालावे. कळावे, ही विनंती.

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ